भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये Rs. 500

सत्यमेव जयते

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2024 ◑ CV 268869

अ.नं. 17497 रू.500/-पैकी रू.500/- दि.19/12/2024

नावः रामेश्वर रूस्तम पवार

पत्ताः घर नं.१४१ मेरी पाट वज्रेश्वरी पंचवटी नासिक

हस्तेः अभिजित पाटील

कारणः एक्स्ट्रा ॲमेनिटीज

TREASURY OFFICE NASIK

16 DEC 2024

STPHC ATO

सही Abhijeet

योगेश बसंत शुक्ल

स्टॅम्प वेंडर नाशिक

परवाना क 97/2002

NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL

NOTARY M. R. DHORE AREA DIST. NASHIK REGD No. 10520 Expiry Date 31/10/2028 GOVT. OF INDIA

NOTARY M. R. DHORE AREA DIST. NASHIK REGD No. 10520 Expiry Date 31/10/2028 GOVT. OF INDIA

NOTARY

NOTED & REGISTERED

at Serial No. 4545

DATE 20/12/2024

This Document Contains

Total 05 Pages

NOTARY
M. R. DHORE
AREA DIST.
NASHIK
REGD.No [illegible]
Expiry Date [illegible]
GOVT. OF INDIA

## जादा सुख सुविधा करारनामा

आज दिनांक: १९ माहे डिसेंबर इसवी सन २०२४ रोज गुरूवार
ते दिवशी नाशिक मुक्कामी...

१. श्री. रामेश्वर रुस्तुम पवार
वयः ५२ वर्षे, धंदाः व्यापार
पॅनः EPOPP 9467 R
आधारः 4635 3945 5701
२. सौ. अनिता रामेश्वर पवार
वयः ४३ वर्षे, धंदाः गृहिणी
पॅनः BPEPP 0266 F
आधारः 8147 1662 7603
राः दत्त मंदिर, दिंडोरी रोड, पाटा जवळ, श्रीराम नगर,
अवधुतवाडी जवळ, पंचवटी, नाशिक-४२२००३

} लिहून घेणार

यांसी...

श्री. संदिपकुमार विनुभाई कावठिया
वयः २६ वर्षे, धंदाः व्यापार
पॅनः EMNPK 2202 M
आधारः 2749 3235 9306
राः कुंवरगढ, अमरेली, गुजरात-३६५४१०
आजमुक्कामी नाशिक

} लिहून देणार

<u>कारणे जादा सुख सुविधा करारनामा लिहून देतो ऐसा जे की,</u>

१) मिळकतीचे वर्णनः तुकडी जिल्हा नाशिक पोट तुकडी तालुका नाशिक पैकी नाशिक महानगरपालिका हद्दीतील **मौजे मखमलाबाद-२** गांवचे शिवारातील यांसी सर्व्हे/गट नं. ३४७/१ चे मंजुर ले-आऊटमधील बिनशेती प्लॉट नं. ५२ ते ५६/१२ यांसी एकुण क्षेत्र १४२.५० चौ.मी. यापैकी नाशिक महानगरपालिका, नाशिक यांचे रस्ता रुंदीकरणासाठी वर्ग झालेले क्षेत्र १५.०० चौ.मी. वजा जाता उर्वरीत क्षेत्र १२७.५० चौ.मी. यावर मंजुर इमारत बांधकाम नकाशान्वये बांधण्यात आलेल्या **''शिवाय रेसिडेन्सी (टाईप सी)''** या नावाने ओळखल्या जाणाऱ्या प्लॉट नं. ५२ ते ५६/१२ यावरील रो-हाऊस नं. १ यांसी प्लॉटचे क्षेत्र ४९.९५ चौ.मी. व त्यावरील बांधीव मजल्यांचे एकुण चटई क्षेत्र ७५.८५ चौ.मी. + नॉर्मल बाल्कनीचे क्षेत्र ३.६५ चौ.मी. ही मिळकत दरोबस्त यांसी चतुःसिमा मंजुर बिल्डींग प्लॅन प्रमाणे.



येणेप्रमाणे चतुःसिमेतील मिळकत त्यावरील जल, तरू, काष्ठपाषाण, निधिनिक्षेप, तदंगभुत वस्तुंसह, जाणे-येणेचे व वागवहिवाटीचे हक्कांसह इतर मिळकत धारकांबरोबर सामाईक सुविधा वापरांचे हक्कांसह दरोबस्त मिळकत.

२. वर कलम १ यात वर्णन केलेली मिळकत ही लिहून घेणार यांनी सौ. प्रभाबेन मुकेशभाई बोकरवाडीया यांच्याकडुन ॲग्रीमेंट फॉर सेल (साठेखत करारनामा) अन्वये विकत घेतलेली असुन त्याबाबतचे ॲग्रीमेंट फॉर सेल (साठेखत करारनामा) मे. दुय्यम निबंधक साहेब, नाशिक यांच्या कार्यालयात नोंदविण्यात आलेले आहे. सदर ॲग्रीमेंट फॉर सेल (साठेखत करारनामा) अन्वये वर वर्णन केलेल्या मिळकतीत लिहून घेणार यांना अंतर्गत वेगळ्या सुख-सुविधा करावयाच्या होत्या व लिहून देणार हे सदर अंतर्गत सुख-सुविधांचे काम करतात याबाबत लिहून घेणार यांना माहिती मिळाली व त्यांनी लिहून देणार यांना आपण घेतलेल्या मिळकतीत बिल्डर्स् कडुन मिळालेल्या सुख-सुविधांच्या व्यतिरीक्त नविन सुख-सुविधा करावयाचे ठरले त्यासाठी सदरचा जादा सुख सुविधा करारनामा लिहून घेणार व लिहून देणार यांचे दरम्यान करावयाचे ठरले त्यासाठी सदरचा करारनामा लिहून देणार हे लिहून देत आहे व मे. नोटरी यांच्या समक्ष नोंदवुन देत आहे.

३. खालील प्रमाणे जादा सुख सुविधा लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना करुन द्यावयाच्या आहे.

| अ. क्र. | तपशिल | रक्कम |
|---|---|---|
| १ | डिझायनर टाईल्स ७ फुट पर्यंत संडास-बाथरुम व किचन मध्ये | ५८,०००/- |
| २ | ग्रॅनाईट ॲन्ड किचन टॉप विंडो सिल | ५६,५००/- |
| ३ | अंतर्गत पी.ओ.पी. (हॉल) | ४६,९००/- |
| ४ | व्हिट्रीफाइड टाईल्स (नॅनो टेक्नो.) | ५०,९००/- |
| ५ | एल.पी.जी. गॅस पाईपलाईन | ४३,५००/- |
| ६ | फॉल सिलींग इन हॉल (डिझाईन+एल.ई.डी. मध्ये) | १६,७००/- |
| ७ | डिझायनर दरवाजा (बाहेरील) वुडन फ्रेममध्ये | ३३,२००/- |
| ८ | इलेक्ट्रीक फिटींग वायर पॉलिकॅब व स्विचेस ॲन्कर रोमा कंपनीचे | ६१,८००/- |
| ९ | भिंतींना ॲक्रॅलिक रंग (एशिन पेंट) | ५६,५००/- |
| १० | स्टॅंडिंग बाल्कनींना एम.एस. सेफ्टी डोअर्स | १७,०००/- |
| ११ | युटिलीटी व पार्किंगमध्ये व्हिट्रीफाईड टाईल्स | ४०,०००/- |
| १२ | वुड रुप, फर्निचर व इतर फिक्चस् | १,६९,०००/- |
| | एकुण- | ६,५०,०००/- |

वर वर्णन केल्याप्रमाणे लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना त्यांच्या मिळकती मध्ये सुख-सुविधा करुन द्यावयाच्या आहेत त्यासाठी लागणारे एकुण खर्च रक्कम रुपये ६,५०,०००/- (अक्षरी रु. सहा लाख पन्नास हजार मात्र) लिहुन घेणार हे कोणत्याही वित्तीय संस्थेकडुन कर्जप्रकरण मंजुर करून घेऊन लिहुन देणार यांचे नावे धनादेश/धनाकर्ष/पे-ऑर्डर/आर.टी.जी.एस. अथवा रोख स्वरुपात अन्वये अदा करतील, ही बाब उभयपक्षांना मान्य असुन त्याबाबत उभयपक्ष भविष्यात कोणताही वाद अथवा तक्रार उपस्थित करणार नाही असेही या दस्तान्वये लिहुन घेणार व लिहुन देणार यांना मान्य व कबुल केलेले आहे.

४. सदरील करारनामा हा लिहून घेणार व लिहून देणार यांच्या वालीवारसांवर बंधनकारक आहे व राहील.

५. सदर जादा सुख सुविधा करारनामा हा लिहून घेणार व लिहून देणार या उभयतांच्या संमतीने कोणाच्याही धाक दडपणांस बळी न पडता, पुर्ण शुध्दीत, त्यातील अटी व शर्ती समजावुन घेऊन लिहुन व नोंदवुन दिलेला आहे.

हा जादा सुख सुविधा करारनामा

नाशिक

१. श्री. रामेश्वर रुस्तुम पवार ........ RR पवार

२. सौ. अनिता रामेश्वर पवार ........ अनिता
(लिहून घेणार)

श्री. संदिपकुमार विनुभाई कावठिया ........ Sandip
(लिहून देणार)

साक्षिदार:

Parties are Identified by me ................ २. ................

ATTESTED

MUKUND R. DHORE
Advocate & Notary Govt.of India
District Court Compound, Nasik-2

NOTARY
M. R. DHORE
GOVT. OF INDIA